# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

परिपत्रक क्र. 114/२०२६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रशासकीय विभागांशी विविध महाविद्यालये/संस्था यांमधील संस्थाचालक/प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी तसेच इतर व्यक्ती यांचा वेगवेगळ्या कामांच्या अनुषंगाने सर्वात जास्त प्रमाणात संपर्क येत असतो. तसेच विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांमध्ये विभागाशी संबंधित कामकाजाकरिता वेळोवेळी बाहेरील व्यक्तींचा संपर्क येत असतो. अशावेळी संबंधित विभागांमधील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या कार्यालयीन कामकाजामधून सदर संबंधीतांस वेळ देणे आवश्यक असते. याकरिता विभागामधील अधिकारी/कर्मचारी यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे विभागाच्यास्तरावर अंमलबजावणी करावी.

१. विद्यापीठातील परीक्षा विभाग व विद्यापीठाचे अहिल्यानगर व नाशिक उपकेंद्र येथील कार्यालयांमध्ये अभ्यागतांसाठी भेटण्याची वेळ ही सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० आणि दुपारी ०३.०० ते ०४.३० अशी करावी, तसेच विद्यापीठातील उर्वरित प्रशासकीय विभागांमध्ये अभ्यागतांसाठी भेटण्याची वेळ ही सकाळी ११.३० ते दुपारी १२.३० आणि दुपारी ०३.०० ते ०४.०० अशी असेल.
२. विद्यापीठ शैक्षणिक विभागातील संबंधित विभागप्रमुख व प्रशासकीय विभागातील शाखाप्रमुख किंवा अधिकारी (Public Offices वगळून) यांनी अभ्यागतांसाठी भेटण्याच्या वेळेत आपल्या विभागातील जागेवर उपस्थित असावे.
३. उपरोक्त नमूद अभ्यागतांसाठी भेटण्याच्या वेळेमध्ये काही अपरिहार्य कारणास्तव संबंधित विभागातील विभागप्रमुख/शाखाप्रमुख/अधिकारी हे अनुपस्थित असल्यास, त्यांनी सदरच्या कामकाजाकरिता विभागामधील उपस्थित असलेल्या अधिकाऱ्याकडे जबाबदारी सोपवावी.
४. विद्यापीठ प्रशासकीय विभागांमध्ये सभांचे नियोजन करताना वरील क्र.०१ ते ०३ मधील निर्देश विचारात घ्यावेत.
५. उपरोक्त धोरण सांविधानिक अधिकाऱ्यांच्या कार्यालयांना लागू राहणार नाही.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 2457
दिनांक : 03 JUL 2026

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा
४. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
५. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणास विनंती की, सदर परिपत्रकातील आशय संबंधीतांच्या निदर्शनास आणावा.